# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. ३००/२०२३**

**विषय :** पीएच.डी. प्रबंध सादर करताना 'Turnitin' व 'Drillbit-Extreme Plagiarism Detection Software' मध्ये तपासणी करून वाङ्मयचौर्य अहवाल (Plagiarism Report) घेणेबाबत...

मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्रे तसेच सर्व मा. विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, पीएच.डी. चे प्रबंध स्वीकारताना विद्यार्थ्याकडून त्याच्या प्रबंधासोबत वाङ्मयचौर्य अहवाल (Plagiarism Report) जमा करून घेण्यात येतो. सदर प्रक्रिया विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केली असल्याने ती सर्व संशोधक विद्यार्थ्यांना अनिवार्य आहे. यापूर्वी पीएच.डी. चे संशोधन प्रबंध 'Turnitin' व 'Urkund' या दोन सॉफ्टवेअरमध्ये तपासणी करून त्याचा अहवाल प्रबंधासोबत जमा करून घेण्यात येत होता. सदरील प्रबंध तपासणीची प्रक्रिया करण्यासाठी विद्यापीठामार्फत संशोधक मार्गदर्शकांना लॉगीन उपलब्ध देण्यात आले होते.

तथापि भारत सरकारच्या उपक्रमांतर्गत शोधशुद्धी या उपक्रमाचा एक भाग म्हणून INFLIBNET या प्रकल्पांतर्गत ०१ नोव्हेंबर, २०२३ पासून 'Drillbit-Extreme Plagiarism Detection Software' लागू करण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने विद्यापीठ परिसर शैक्षणिक विभागातील संशोधक मार्गदर्शकांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांना संशोधन प्रबंध सादर करताना 'Turnitin' या सॉफ्टवेअरमध्ये तपासणी करून त्याचा वाङ्मयचौर्य अहवाल (Plagiarism Report) जमा करावा व संलग्नित संशोधन केंद्रातील संशोधक मार्गदर्शकांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांना संशोधन प्रबंध सादर करताना 'Drillbit-Extreme Plagiarism Detection Software द्वारे तपासणी करून त्याचा वाङ्मयचौर्य अहवाल (Plagiarism Report) जमा करावा.

सदरील वाङ्मयचौर्य अहवाल (Plagiarism Report) तपासणी करताना संशोधक मार्गदर्शकांनी त्यांच्या लॉगीनद्वारे तपासावा व तो अहवाल संशोधन केंद्राच्या Departmental Academic Integrity Panel (DAIP) समितीच्या समोर ठेवून त्यावर सर्व सदस्यांच्या स्वाक्षरीसह विद्यापीठाकडे पाठवावा.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

संदर्भ : शै. प्रवेश/ ४६९३
दिनांक : ०५/१२/२०२३

**प्रत:**

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२. मा. प्राचार्य/संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

(१ व २ साठी:) आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील/संशोधन केंद्रातील सर्व संशोधन मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून उपरोक्त दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी.

३. मा. संचालक, आय.टी. सेल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे